# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

**तक्रार क्रमांक : ६३३/२०२२**

तक्रारकर्ता, श्री.सदानंद यशवंत विचारे
१/४ देवदयानगर को.ऑ.हौ.सो.,फेज-१
देवदया नगर, पोखरण रोड नं.१, ठाणे (प) ४०० ६०६

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप यंत्र अभियंता, राज्य परिवहन, ठाणे
राज्य मार्ग परिवहन महामंडळ ठाणे, वंदना टॉकिजच्या समोर, ठाणे (प)

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप यंत्र अभियंता, राज्य परिवहन, ठाणे
राज्य मार्ग परिवहन महामंडळ ठाणे, वंदना टॉकिजच्या समोर, ठाणे (प)

**तक्रार सुनावणीचा दिनांक : २१/५/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २२/१०/२०२० | ---- | २५/१/२०२१ | ६/३/२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.२२/१०/२०२० रोजीच्या अर्जान्वये " मागितलेली माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २१/५/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक लक्ष्मण लांडगे, उप यंत्र अभियंता, रा.प.विभागीय कार्यशाळा कळवा, ठाणे उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" सन १९९६ ते २००० या कालावधीच्या करारा मधुन ५% रक्कम संघटना निधीतुन कपात करण्यात आली होती त्या तपशिलाची माहिती व इतर माहिती"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि.६/३/२०२१ रोजी सुनावणी घेऊन, *"अपिलार्थी यांचेकडुन मागितलेल्या माहितीबाबतची तपासणी केली असता सदरची माहिती आर्थिक बाबीशी निगडीत असल्यामुळे याबाबतची माहिती लेखा अधिकारी यांचेकडून अपिलार्थी यांना पंधरा दिवसाचे आत उपलब्ध करून देण्यात येईल. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेकडुनही पुनःश्च आवश्यक ती तपासणी करून सदरची माहिती उपलब्ध होत असल्यास अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात यावी."* असा निर्णय दिलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, तक्रारदार यांना दि.२६/१०/२०२४ च्या पत्राव्दारे माहिती दिलेली आहे. सदर पत्र प्रत सादर केली.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आल्यामुळे, तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ मे, २०२५ .

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

Comp-३